महसूल व वन विभाग

# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांचे कार्यालय, जळगाव

(गृह शाखा)

आकाशवाणी केंद्राजवळ, जळगांव, ता.जि.जळगाव - 425 001

**दुरध्वनी क्रमांक** - 0257- 2220152 **ई मेल** - homebranchjalgaon@gmail.com

क्र दंडप्र-01/कावि/2020/ 501 दिनांक ~~30/09/2020~~ 01/10/2020

**विषय :- सार्वजनिक नवरात्रौत्सव 2020**
**मार्गदर्शक सुचना...**

## परिपत्रक :-

जळगांव जिल्हयात करोना विषाणूचा (कोव्हिड-19) वाढता प्रादुर्भाव व कोव्हिड-19 पॉझिटीव्ह रुग्णांची वाढती संख्या लक्षात घेता, प्रभावी प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविणे क्रमप्राप्त आहे. सदर प्रतिबंधात्मक उपाययोजनांचा भाग म्हणून जळगांव जिल्हयात या वर्षीचा नवरात्रौत्सव/दुर्गापूजा/दसरा साध्या पध्दतीने साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्याअनुषंगाने खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना देण्यात येत आहे.

1. सार्वजनिक नवरात्रौत्सवासाठी मंडळांनी महापालिका/नगरपालिका/स्थानिक प्रशासन यांची त्यांचे धोरणानुसार यथोचित पूर्वपरवानगी घेणे आवश्यक राहिल.
2. कोविड-19 मुळे उद्‌भवलेल्या संसर्गजन्य परिस्थितीचा विचार करता तसेच मा. न्यायालयाने निर्गमित केलेले आदेश आणि महानगरपालिका तसेच संबंधित स्थानिक प्रशासनाचे मंडपांबाबतचे धोरण यांचेशी सुसंगत असे मर्यादीत स्वरुपाचे मंडप उभारण्यात यावेत.
3. या वर्षीचा नवरात्रौत्सव साध्या पध्दतीने साजरा करणे अपेक्षित असल्याने घरघुती तसेच सार्वजनिक देवीच्या मुर्तीची उंची सजावट त्या अनुषंगाने करण्यात यावी.
4. देवीच्या मुर्तीची उंची सार्वजनिक मंडळाकरिता 4 फुट व घरघुती देवीच्या मुर्तीची उंची 2 फूटांच्या मर्यादेत असावी.
5. या वर्षी शक्यतो पारंपारिक देवीच्या मुर्तीऐवजी घरातील धातू/संगमरवर आदी मुर्तीचे पूजन करावे. मुर्ती शाडूची /पर्यावरण पूरक असल्यास तिचे विसर्जन शक्यतो घरच्या घरी करावे. विसर्जन घरी करणे शक्य नसल्यास कृत्रीम विसर्जन स्थळी विसर्जन करण्यासंदर्भात स्थानिक प्रशासनाशी समन्वय ठेवावा.
6. नवरात्रौत्सवाकरिता वर्गणी/देणगी स्वेच्छेने दिल्यास त्यांचा स्वीकार करावा. जाहिरातींच्या प्रदर्शनांमुळे गर्दी आकर्षित होणार नाही असे पहावे. तसेच आरोग्य विषयक व सामाजिक संदेश असलेल्या जाहिराती प्रदर्शित करण्यास पसंती देण्यात यावी. तसेच "माझे कुटूंब माझी जबाबदारी" या मोहिमेबाबत देखील जनजागृती करण्यात यावी.
7. गरबा, दांडिया व इतर सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करु नयेत. त्याऐवजी आरोग्य विषयक उपक्रम शिबीरे (उदा. रक्तदान) आयोजित करण्यास प्राधान्य देण्यात यावे आणि त्याव्दारे कोरोना, मलेरिया, डेंग्यू इ. आजार आणि त्यांचे प्रतिबंधात्क उपाय तसेच स्वच्छता याबाबत जनजागृती करण्यात यावी.
8. आरती, भजन, किर्तन वा अन्य धार्मिक कार्यक्रम आयोजित करतांना गर्दी होणार नाही याची दक्षता घ्यावी तसेच ध्वनी प्रदुषणासंदर्भातील नियमांचे व तरतूदींचे पालन करण्यात यावे.

9. देवीच्या दर्शनाची सुविधा ऑनलाईन, केबल नेटवर्क, वेबसाईट व फेसबुक इत्यादीव्दारे उपलब्ध करुन देण्याबाबत जास्तीत जास्त व्यवस्था करण्यात यावी.

10. देवीच्या मंडपांमध्ये निर्जंतुकीकरणाची तसेच थर्मल स्क्रिनींगची पर्याप्त व्यवस्था करण्यात यावी. प्रत्यक्ष येऊन दर्शन घेऊ इच्छिणाऱ्या भाविकांसाठी शारिरीक अंतराचे (फिजिकल डिस्टन्सींग) तसेच स्वच्छतेचे नियम (मास्क, सॅनीटायझर इत्यादी) पाळण्याकडे विशेष लक्ष देण्यात यावे.

11. देवीच्या आगमन व विसर्जन मिरवणूका काढण्यात येऊ नयेत. विसर्जनाच्या पारंपारिक पध्दतीत विसर्जन स्थळी होणारी आरती घरीच करुन विसर्जन स्थळी कमीत कमी वेळ थांबावे. लहान मुले आणि वरीष्ठ नागरिकांनी सुरक्षेच्या दृष्टीने विसर्जनस्थळी जाणे टाळावे. संपूर्ण चाळींतील/ इमारतीतील सर्व घरघुती देवीच्या मुर्तीच्या विसर्जनाची मिरवणुक एकत्रितरित्या काढण्यात येऊ नये.

12. महानगरपालिका, महापालिका, विविध मंडळे, गृहनिर्माण संस्था, लोक प्रतिनिधी, स्वयंसेवी संस्था इत्यादींच्या मदतीने कृत्रीम तलावांची निर्मीती करण्यात यावी. तसेच नागरीकांची गर्दी टाळण्यासाठी स्थानिक प्रशासनाने प्रभाग समितीनिहाय मूर्ती स्विकृती केंद्राची व्यवस्था करावी व याबाबत जास्तीत जास्त प्रसिध्दी देण्यात यावी.

13. मंडपात एकावेळी 5 पेक्षा जास्त कार्यकर्त्यांची उपस्थिती नसावी. तसेच मंडपामध्ये खाद्यपदार्थ अथवा पेय पानाची व्यवस्था करण्यास मनाई असेल.

14. विसर्जनाच्या तारखेस जर घरघुती तसेच सार्वजनिक नवरात्रौत्सव मंडळाचा परिसर प्रतिबंधित क्षेत्रात असेल तर, मूर्ती विसर्जन सार्वजनिक ठिकाणी करण्यास मनाई असेल.

15. दसऱ्याच्या दिवशी करण्यात येणारा रावण दहनाचा कार्यक्रम हा सर्व नियम पाळून प्रतिकात्मक स्वरुपाचा असावा. रावण दहनाकरीता आवश्यक तेवढ्या किमान व्यक्तीच कार्यक्रमस्थळी हजर राहतील. प्रेक्षक बोलावू नयेत. त्यांना फेसबुक इत्यादी समाज माध्यमातुन थेट प्रक्षेपणाव्दारे बघण्याची व्यवस्था करावी.

16. कोविड-19 या विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी शासनाच्या मदत व पुनर्वसन, आरोग्य, पर्यावरण, वैद्यकिय शिक्षण विभाग तसेच संबंधित महानगरपालिका, नगपालिका, नगरपंचायती, पोलीस स्थानिक प्रशासन यांनी विहित केलेल्या नियमांचे अनुपालन करणे बंधनकारक राहील. तसेच या परिपत्रकानंतर व प्रत्यक्ष उत्सव सुरु होण्याच्या मधल्या कालावधीत अजून काही सूचना प्रसिध्द झाल्यास त्यांचे देखील अनुपालन करावे.

वरील सुचनांचे पालन न केल्यास संबंधितांवर आपत्ती व्यवस्थापन कायदा, 2005 व भारतीय दंड संहिता, 1860 चे कलम 188 नुसार कारवाई करण्यात येईल.

जिल्हा दंडाधिकारी जळगांव

**(अभिजीत राऊत)**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जळगांव**

**प्रत :- माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी**

1. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद जळगांव
2. पोलीस अधिक्षक जळगांव
3. आयुक्त, जळगांव शहर महानगरपालिका जळगांव
4. उपविभागीय दंडाधिकारी सर्व
5. कार्यकारी दंडाधिकारी सर्व
6. मुख्याधिकारी (सर्व), नगरपालिका / नगरपंचायत